N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना  **P.S.(ठाणे):** तालुका जालना  **Year (वर्ष):** 2021

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0446  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/10/2021 00:06 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** शनिवार

      **Time Period (कालावधी):** पहर 5

      **Date From (दिनांक पासून):** 02/10/2021

      **Date To (दिनांक पर्यंत):** 02/10/2021

      **Time From (वेळेपासून):** 13:15 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 02/10/2021  **Time (वेळ):** 23:43 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

   **Entry No. (नोंद क्र.):** 048  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/10/2021 23:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व

   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे तालुका जालना,आवारात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** सय्यद सलीम सय्यद महेबुब

   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा देवमुर्ती, ताजि जालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा देवमुर्ती, ताजि जालना,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.सुरेश बाबुराव कासुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे तालुका जालना | | | 1. भालगाव ता पाथर्डी जि अहमदनगर,हनु स्पंदन बिल्डींग, यशवंतनगर,अंबड रोड, जालना,तालुका जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | चरणसिंग विजयसिंग सिंगल पोक182 नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना | | | 1. आरदखेडावाडी ता जाफ्राबाद जि, जालना,ह मु सर्व्हे नं 488 पोलीस , मुख्यालय,जालना,तालुका जालना, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 30,000/ रुपये अ पा लाचलेले | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 30,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद जालना दिनांक 02.10.2021.मी, सय्यद सलीम सय्यद महेबुब, वय 38 वर्ष, व्यवसाय शेती, रा. देवमुर्ती, ता.जि. जालना, मो. नं. 8830769891.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग जालना येथील पो नि श्री ताटे व दोन पंचासमक्ष माझ्या देवमुर्ती येथील घरी तक्रार दिली होती कि, मी दिनांक 01.10.2021 रोजी माझ्या वरील मोबाईल फोनव्दारे पोलीस निरीक्षक श्री. संग्राम ताटे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांना त्यांचा मो नं. 8390757835 यावर फोनव्दारे कळविले की, मला पोलीस ठाणे तालुका जालना, येथील एक पोलीस अधिकारी लाचेची मागणी करत आहेत, असे सांगुन मी त्यांना म्हणालो कि, आता मुसळधार पाऊस चालु आहे, मी तुम्हाला उदया भेटुन माझी तक्रार देतो. त्यावरुन आज दि. 02.10.2021 रोजी मी पुन्हा पोलीस निरीक्षक ताटे यांना फोन केला असता ते मला म्हणाले कि, मी पंच व स्टफसह आपणास भेटण्यासाठी तुमच्या गावी देवमुर्ती येथे येतो असे कळवुन ते थोडया वेळाने देवमुर्ती येथे माझ्या घरी त्यांचे सोबतचा स्टफ व दोन पंचासह आले व त्यांनी माझा परिचय करुन घेवुन त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर माझी तक्रार मी पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री ताटे यांना दिली ती, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. तसेच देवमुर्ती येथे स्वीट मार्ट दुकान व जामवाडी ता. जि. जालना येथे युवराज रेस्टारन्ट आहे. दि.12.09.2021 रोजी पोलीस ठाणे तालुका जालना यांच्या हदिदतील मौजे धारकल्याण ता. जि. जालना शिवारात रेडा (हेला) ह्या प्राण्यांची झुंज लावुन जुगार खेळणे व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक देवुन कोरोना रोगाचा प्रादुर्भाव करण्यात आल्याबाबत गुन्हा दाखल झालेला होता. त्या गुन्ह्याबाबत पोलीस ठाणे तालुका जालना येथील ए पी आय श्री कासुळे साहेब यांचा मला दि. 01.10.2021 रोजी फोन आला व त्यांनी मला सांगीतले कि, धारकल्याण येथे झालेल्या रेडयांच्या टक्करीच्या गुन्ह्यात तुमचे भाऊ नामे सय्यद गब्बर यांचे नाव आहे. त्यामध्ये त्यांना अटक करावी लागेल, तेव्हा मी त्यांना म्हणालो कि, माझा भावाचे नाव गब्बर असुन त्यांचे मुळ नाव सयद कलीम आहे. मी आता कामात आहे, उदया किंवा सोमवारी मी तुमच्याकडे येतो, परंतु त्यांनी माझे काही एक ऐकले नाही व म्हणाले कि, मी देवमुर्ती येथे येवुन तुमच्या भावाला घेवुन जातो. असे म्हणुन थोडयावेळात ए पी आय श्री. कासुळे साहेब, हे पोलीसाची सरकारी

दह दे दो असे म्हणाल्याकर मी त्यांना माझ्या पन्टच्या उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम ज्यास अँथ्रासिन पावडर लावलेले आहेत ते 30,000 रुपये काढुन दिले. ते त्यांनी माझ्याकडुन घेवुन त्यांच्या पोलीसच्या गणेवशातील पन्टच्या उजव्या खिशात ठेवुन तेथुन निघुन पोलीस ठाणेमध्ये गेले असता मी 01.15 वा सापळा पथकास आधी ठरल्याप्रमाणे पो नि ताटे यांचे फोनवर मिसकल देवुन इशारा देताच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहे(शब्द मर्यादा असल्याने सोबत गुन्ह्याची मुळ फिर्याद जोडली आहे.)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or** (किंवा)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PI / एन. एस. ताटे

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~RAVINDRA DEVIDAS NIKALJE~~

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PIACB **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारनामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारन हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.) [signature]

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

[signature]

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]

पोलीस ठाणे अधिकारी
पो. स्टे ता ... जि. जालना

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

**Name** (नाव): Maruti Bhimsen Khedkar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1460100450MBKM7901G

त्यावर मी त्यांना म्हटलो कि, मी लगेच आलो, त्यावेळी ते म्हणाले कि, पोलीस स्टेशनला या किंवा आपण अंबड चौफुली येथे भेटु असे म्हणाल्यावर मी व पंच नं.1 ढेंगळे असे तेथुन निघुन माझ्या गाडीवरुन जालना रेवगाव रोडवर सुरक्षित ठिकाणी आलो. तसा लाच स्वीकारणार असल्याचे निष्पन्न झालेबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर लगेच मला पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, त्यांचे सोबतचा ला.प्र.वि.जालना येथील स्टॉफ व नमुद दोन पंच यांचेसमक्ष जालना रेवगाव रोडवर रस्त्याचे कडेला सुरक्षित ठिकाणी खाजगी वाहनामध्ये अंथ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हाईलेट लॅम्प यांची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पैशातुन 30,000/- रुपये वेगळे काढले व त्याला अंथ्रासीन पावडर लावली. एपीआय श्री. कासुळे साहेब व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना देण्यासाठी ॲंथ्रॉसीन पावडर लावलेले पैसे माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवले. सापळा पथकातील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर मला पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी सुचना दिली की, एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांनी लाच स्वीकारल्यानंतर माझ्या फोनवर मिसकॉल दया. असे सांगीतले. त्यांनतर परत व्हाईस रेकॉर्डबाबत माहिती दिली. याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर मला व पंच नं 1. श्री. गजानन ढेंगळे असे एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना भेटण्यासाठी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पॅन्टच्या बंदला बांधुन पोलीस ठाणे तालुका जालना येथे पाठविले. त्यानंतर मी व पंच 1. श्री. गजानन ढेंगळे असे माझ्या मोटार सायकलने अंबड चौफुलीकडुन पोलीस ठाणे तालुका जालना येथे निघालो, आमच्या मागेच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व सर्व स्टॉफ तसेच पंच नं 2 श्री. गौतम अंभोरे असे आले व त्यांनी तेथे सापळा लावला. सर्व जण एकमेकांना दिसतील, अशा रितीने पोलीस ठाण्याच्या आवारात थांबले. तेव्हा मी आणि पंच क्रं 1. गजानन ढेंगळे असे पोलीस ठाणे तालुका जालना येथे जावुन एपीआय श्री कासुळे साहेब यांना सांगितले कि, मी पैसे घेवुन आलो आहे. त्यावेळी ते मला म्हणाले कि, तुम्ही बाहेर थांबा, त्यावर मी कासुळे साहेबांना म्हणालो कि, मी चहाचे हॉटेलवर थांबतो. असे म्हणुन मी व पंच नं. 1 ढेंगळे असे चहाचे हॉटेलवर जावुन थांबलो. त्यानंतर 5 मिनीटानंतर पोलीस कर्मचारी सिंगल यांना फोन केला असता ते म्हणाले कि, 5 मिनीटात मी आलो. त्यानंतर पोलीस कर्मचारी सिंगल हे पोलीस ठाण्याच्या बाहेर असलेल्या चहाचे हॉटेलवर आले व मला बाजुला घेवुन म्हणाले कि, सांहब ने बोला है वह दे दो असे म्हणाल्यावर मी त्यांना माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम ज्यास अंथ्रासिन पावडर लावलेले आहेत ते 30,000 रुपये काढुन दिले. ते त्यांनी माझ्याकडुन घेवुन त्यांच्या पोलीसच्या गणवेशातील पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन तेथुन निघुन पोलीस ठाणेमध्ये गेले असता मी 01.15 वा सापळा पथकास आधी ठरल्याप्रमाणे पो नि ताटे यांचे फोनवर मिसकॉल देवुन इशारा देताच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व त्यांचे सोबतचा स्टॉफ तसेच पंच नं.2 श्री. गौतम दाभाडे असे लगेच तालुका जालना पोलीस ठाणे येथे जावुन एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना ताबडतोब पकडले. पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी मला जवळ बोलावुन माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केला, त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली. एपीआय श्री. कासुळे साहेब व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव 1. श्री. सुरेश बापुराव कासुळे, वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना, मुळ रा. भालगाव ता. पाथर्डी जि. अहमदनगर हमु. स्पंदन बिल्डींग, यशवंतनगर, अंबड रोड, जालना 2. श्री. चरणसिंग विजयसिंग सिंगल वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी, पोकॉ/182 नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना मुळ रा. आरदखेडावाडी ता. जाफ्राबाद जि. जालना हमु.सर्व्हे नं. 488 पोलीस क्वार्टर, 209/250 पोलीस मुख्यालय, जालना असे सांगीतले. तेव्हा पोलीस निरीक्षक ताटे यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष लाचेची रक्कम कोणी स्वीकारली आहे, असे विचारता त्यांनी पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांनी लाचेची रक्कम 30,000 रु स्वीकारुन त्यांचे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले, त्यानंतर ती रक्कम पंच क्र 2. श्री. गौतम अंभोरे यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यानंतर पंच नं. 2 यांनी ताब्यात घेतलेल्या नोटांचे नंबरची खात्री करुन नोटावर तसेच पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांचे हात व पॅन्टचा खिसा यावरील अन्थ्रासिन पावडर अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे उजेडात तपासण्यात आले, तेव्हा पोलीस कर्मचारी सिंगल यांचे उजव्या हातावर व पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशावर व पंच नं.2 यांनी ताब्यात घेतलेल्या नोटावर अंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी ठिकठिक ठिकाणी दिसुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, स्टॉफ, दोन्ही पंच, मी व एपीआय श्री. कासुळे साहेब, व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे आलो. सर्व घटनेबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

तरी आज दिनांक 02.10.2021 रोजी पोलीस ठाणे तालुका जालना येथे एपीआय श्री. कासुळे साहेब यांनी माझ्या भाऊ गब्बर यास रेडयांच्या टक्करीच्या गुन्हयात आरोपी न करण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी पंच क्रं 1. श्री. गजानन ढेंगळे यांचेसमक्ष करुन ती लाचेची रक्कम पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांचेकडे देण्यास सांगुन ती लाचेची रक्कम 30,000 रु पोलीस कर्मचारी श्री सिंगल यांनी माझ्याकडुन दि.02.10.2021 रोजी 01.15 वा स्विकारली, तेव्हा त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.

सय्यद सलीम सय्यद महेबुब